# शिक्षणवेध

संपादक

प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार
डॉ. पी. विठ्ठल
डॉ. राजेश्वर दुडूकनाळे

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

डायमंड पब्लिकेशन्स

**शिक्षणवेध**

संपादक : प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, डॉ. पी. विठ्ठल, डॉ. राजेश्वर दुडूकनाळे

Shikshanvedha

Sampadak : Prin. Dr. Nagorao Kumbhar, Dr. P. Vitthal, Dr. Rajeshwar Duduknale

•

पहिली आवृत्ती : ऑगस्ट, २०१८

•

ISBN : 978-93-86401-49-6

•

© मा. कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड–४३१ ६०६.

•

मुखपृष्ठ : शाम भालेकर

•

अक्षरजुळणी : डायमंड पब्लिकेशन्स, पुणे

•

मुद्रक : स्पेक्ट्रम ऑफसेट, पुणे

•

प्रकाशक

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड–४३१ ६०६.

आणि

डायमंड पब्लिकेशन्स

२६४/३ शनिवार पेठ, ३०२ अनुग्रह अपार्टमेंट

ओंकारेश्वर मंदिराजवळ, पुणे–४११ ०३०

☎ ०२०-२४४५२३८७, २४४६६६४२

info@diamondbookspune.com

ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी भेट द्या
www.diamondbookspune.com

•

मूल्य : ₹ ८४०

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी–फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या आणि लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

• या ग्रंथातील लेखातून व्यक्त झालेली मते संबंधित लेखकाची वैयक्तिक मते आहेत. संपादक मंडळ या मतांशी सहमत असेलच असे नाही.

**सल्लागार समिती**

प्रमुख मार्गदर्शक
डॉ. पंडित विद्यासागर
(कुलगुरू)

डॉ. गणेशचंद्र शिंदे (प्र-कुलगुरू)

डॉ. गोविंद कतलाकुटे (वित्त व लेखाधिकारी)

डॉ. रमजान मुलाणी (कुलसचिव)

**संपादन साहाय्य**

डॉ. सरिता यन्नावार (सहायक कुलसचिव)

डॉ. अशोक कदम (जनसंपर्क अधिकारी)

श्री. डी. आर. कोंका (लघुलेखक)

श्री. संतोष चव्हाण (लघुलेखक)

## विद्यापीठ गीत

विद्येची अन् पवित्रतेची इथे वाहते ज्ञानधारा
मानवतेचा मंगलमय हा इथे खेळतो विश्वतारा ।। धृ. ।।
तेजोमय उजळिती प्रकाश
श्रमाचे, कष्टाचे आकाश
संपविते सौदामिनी, युगांचा अंधार सारा
विद्येची अन् पवित्रतेची इथे वाहते ज्ञानधारा ।। १ ।।
चंदनाची व्रतस्थ भूमि
प्रज्ञा, प्रतिभा गगनगामी
समतेचा ममतेचा हा साधनेचा अढळ तारा
विद्येची अन् पवित्रतेची इथे वाहते ज्ञानधारा ।। २ ।।
बुद्धकरुणेचा विहार इथे
शिवरायाचा आचार इथे
निरंतर न्यायासाठी स्वातंत्र्याचा इथे पहारा
विद्येची अन् पवित्रतेची इथे वाहते ज्ञानधारा ।। ३ ।।
विचार-विवेक विज्ञानाचे
ज्ञानतीर्थ हे महात्मतेचे
मातीच्या मोहराचा गोदावरीचा इथे किनारा
विद्येची अन् पवित्रतेची इथे वाहते ज्ञानधारा ।। ४ ।।

– फ. मुं. शिंदे

## अंतरंग


१ संपादकीय / १
**प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, डॉ. पी. विठ्ठल, डॉ. राजेश्वर दुडूकनाळे**

2 Overview of the progress made since 1994: Special reference to 2013-2018 / ७
**Dr. Pandit Vidyasagar**

३ मी आणि माझा विद्यापीठातील कार्यकाळ / २०
**डॉ. जनार्दन वाघमारे**

४ मी आणि माझा विद्यापीठातील कार्यकाळ / ७३
**डॉ. शेषराव आ. सूर्यवंशी**

५ विद्यापीठाची सशक्त वाटचाल / ७७
**डॉ. सर्जेराव भा. निमसे**

६ स्वप्नपूर्तीची वाटचाल... / ८४
**डॉ. पंडित विद्यासागर**

७ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड : एक सुवर्ण आठवण / १०९
**डॉ. दिलीप उके**

८ माझा प्र-कुलगुरू पदावरील कार्यकाळ / ११८
**डॉ. गणेशचंद्र शिंदे**

९ Evolution of an Aspiring University / १३०
**Prin. N. C. Varadacharyulu**

१० स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि मी / १३५
**डॉ. सूर्यनारायण रणसुभे**

११ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील माझा सहभाग / १४१
**प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार**

१२ विद्यापीठ घडणीतला माझा सहभाग / १५५
**प्रा. दत्ता भगत**

१३ आमचे विद्यापीठ – माझे विद्यापीठ / १६८
प्रा. मधुकर राहेगावकर

१४ माझा विद्यापीठातील सेवा काळ / १७७
प्राचार्य डॉ. ना. आ. मोरे

१५ लेखाजोखा : वित्त व लेखा विभागाचा / १८२
डॉ. गोविंद कतलाकुटे

१६ परीक्षा विभागाची यशस्वी वाटचाल / २०६
डॉ. रवि एन. सरोदे

१७ Innovation, Incubation & Linkages / २१५
Dr. Shailesh J. Wadher

१८ विद्यापीठ उपकेंद्र लातूर : वाटचाल / २२१
डॉ. देवेंद्रनाथ मिश्रा

१९ माझा नांदेड विद्यापीठातील कार्यकाळ / २२५
डॉ. व्ही.एन. शिंदे

२० डॉ. पंडित विद्यासागर : द्रष्टे कुलगुरू / २४२
ॲड. अशोक सोनी

२१ महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ / २४६
डॉ. जे. व्ही. जोशी

२२ भौतिकशास्त्रे संकुल / २५३
डॉ. आर. एस. खैरनार

२३ School of Social Sciences / २५८
Dr. A. I. Shaikh

२४ रसायनशास्त्रे संकुलाची यशस्वी वाटचाल : एक दृष्टीक्षेप / २६८
डॉ. संगीता एस. माकोने

२५ School of Earth Sciences / २७८
S.K.G. Krishnamacharyulu, Ramaknat D. Kaplay

२६ गणितीयशास्त्रे संकुल / २९०
डॉ. ज्ञानेश्वर दादाजी पवार

२७ Recap of my Journey in development of srtmu / २९६
Prof. Mrs. Vani N. Laturkar

२८ माध्यमशास्त्र संकुल / ३०५
डॉ. दीपक शिंदे

२९ औषधनिर्माणशास्त्रे संकुल / ३०९
डॉ. सुरेंद्र गट्टाणी

३० भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल / ३१४
डॉ. दिलीप चव्हाण, डॉ. शैलजा वाडीकर

३१ शिक्षणशास्त्र संकुलाची निरंतर विकासात्मक वाटचाल / ३१८
डॉ. वैजयंता पाटील

३२ मी आणि माझा विद्यापीठातील कार्यकाळ / ३२६
डॉ. राजेंद्र धनाजी बिरादार

३३ जैवशास्त्र संकुल / ३३२
डॉ. सी. एन. खोब्रागडे

३४ संगणकशास्त्र विभागाची वाटचाल : एक सिंहावलोकन / ३३५
डॉ. संतोष धो. खमीतकर

३५ मी व विद्यापीठातील माझा कार्यकाळ / ३४०
डॉ. भगवान एस. जाधव

३६ Department of Spanish / ३४४
Zishan Ali

३७ क्रीडा विभाग : एक आढावा / ३४८
डॉ. प्रदीप नागनाथराव देशमुख

३८ विद्यार्थी विकास विभागाची वाटचाल : एक दृष्टीक्षेप / ३५५
डॉ. राजेश्वर दुडूकनाळे

३९ राष्ट्रीय सेवा योजना वाटचाल : एक सिंहावलोकन / ३६४
डॉ. डी. डी. पवार

४० स्वा. रा. ती. म. विद्यापीठाचे ज्ञानस्रोत केंद्र : एक परिचय / ३६८
डॉ. जगदीश नरहराव कुलकर्णी

४१ दूरशिक्षण संचालनालय : निर्मिती व वाटचाल / ३७६
डॉ. राम जाधव

४२ श्री गुरू गोबिंद सिंघजी अध्यासन संकुल व संशोधन केंद्र / ३८२
डॉ. दीपक शिंदे

४३ आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र / ३८४
डॉ. भगवान एस. जाधव

४४ डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्र / ३८७
डॉ. पी. विठ्ठल

४५ उत्तमरावजी राठोड आदिवासी संशोधन व विकास केंद्र : एक दृष्टीक्षेप / ३९२
डॉ. रामप्रसाद तौर, डॉ. घनश्याम येळणे

४६ The Infrastructure and Campus Development S.R.T.M. University, Nanded / ४००
**Arun Patil**

४७ विद्यापीठाची शैक्षणिक आणि प्रशासकीय पायाभरणी / ४०६
डॉ. सरिता यन्नावार

४८ स्वा. रा. ती. म. विद्यापीठाची प्रकाशने : एक अवलोकन / ४२१
डॉ. जगदीश नरहरराव कुलकर्णी

४९ कुलसचिव कार्यालय योगदान : एक सिंहावलोकन / ४३२
डॉ. आर. एम. मुलाणी

५० परिशिष्ट / ४४०

• • •

# संपादकीय

'स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठा'च्या आजवरच्या वाटचालीचा लेखाजोखा मांडणारा 'शिक्षणवेध' हा ग्रंथ आपल्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे. अर्थात, हा लेखाजोखा म्हणजे विद्यापीठाच्या जडणघडणीचा समग्र इतिहास नसला, तरी हा ग्रंथ एक वैशिष्ट्यपूर्ण आणि लक्षणीय प्रकल्प म्हणता येईल.

मराठवाडा ही भूमी खूप अर्थाने मौलिक आहे. या प्रदेशाची स्वत:ची काही वैशिष्ट्ये आहेत. ही वैशिष्ट्ये केवळ भौगोलिकच आहेत असे नाही; तर राजकीय, धार्मिक, भाषिकसुद्धा आहेत. प्रदीर्घ संघर्षाची रणभूमी असलेला मराठवाडा विचारांचे एक महत्त्वाचे केंद्रही राहिलेला आहे. त्यामुळे या प्रदेशात आणि विशेषत: तेलंगाणा, कर्नाटक या अन्य राज्यांच्या सीमारेषेवर नांदेडमध्ये स्थापन झालेले हे विद्यापीठ अनेक अर्थाने महत्त्वाचे आहे. हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अग्रगण्य नेते स्वामी रामानंद तीर्थ यांचे नाव या विद्यापीठाला असणे हीसुद्धा खूप अर्थपूर्ण घटना मानायला हवी. या विद्यापीठामुळे मराठवाड्यातील उच्चशिक्षणाची चळवळ अधिक गतिमान झाली. नांदेड, परभणी, हिंगोली आणि लातूर या चार जिल्ह्यांत विस्तारलेल्या या विद्यापीठाने खऱ्या अर्थाने आपल्या कर्तृत्वाने स्वत:ची ओळख सिद्ध केली. अर्थात, २४ वर्षांचा टप्पा हा कमी काळ आहे, पण या कमी काळातही या विद्यापीठाने स्वत:ला सिद्ध केले. ही सिद्धता भविष्यातील गतिमान वाटचालीचे अधोरेखन करणारी घटना आहे असे आम्हाला वाटते.

नांदेड या शहराची जगभर ओळख आहे ती इथे असलेल्या गुरुद्वारामुळे. ही ओळख अर्थातच धार्मिक आणि ऐतिहासिक या स्वरूपाची आहे. मात्र, विद्यापीठामुळे या शहराची आणि एकूणच या प्रदेशाची ओळख ही जगभरात झाली ती गुणवत्तापूर्ण

विद्यापीठामध्ये स्पोर्टस अँथॉरिटी ऑफ इंडियाचे 'क्रीडा मार्गदर्शक प्रमाणपत्र' अभ्यासक्रम सुरू करण्यात यावा. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन महाविद्यालय व विद्यालय परिसरात आयोजित केल्याने लहान मुलांना खेळाविषयी आवड निर्माण होऊन क्रीडा कौशल्ये विकसित होईल व क्रीडा प्रसार होऊन चांगले खेळाडू निर्माण होतील. मुलींचा क्रीडा प्रकारात सहभाग वाढविण्यासाठी क्रीडा मार्गदर्शन शिबीराचा कालावधी वाढवणे, उन्हाळी व हिवाळी सुट्यामध्ये क्रीडा शिबीरांचे आयोजन करणे, आहार तज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ व व्यायाम तज्ज्ञ यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. विद्यापीठाने व महाविद्यालयाने फक्त महाविद्यालयीन व विद्यापीठीय खेळाडूंचा विचार न करता विद्यालयातील खेळाडूंचा विचार करून विद्यालयातील क्रीडा शिक्षकांना विद्यापीठीय व महाविद्यालयीन क्रीडा सुविधांची वापर करण्यास सवलत देऊन लहानपणापासून क्रीडा संस्कृती रुजविण्याचा प्रयत्न करावा. परिसरातील गुणवंत व उदयोन्मुख खेळाडूंचा शोध घेऊन त्यांना सोयी–सुविधा देण्याचा कार्यक्रम राबविण्यात यावा. विद्यापीठीय व महाविद्यालयीन सोयी–सुविधा ह्या नाममात्र दराने क्रीडा मंडळे व विद्यालय यांना उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत.

•••



# ३८

## विद्यार्थी विकास विभागाची वाटचाल : एक दृष्टीक्षेप

डॉ. राजेश्वर दुडूकनाळे
संचालक, विद्यार्थी विकास

विद्यापीठाच्या निर्मितीनंतर विविध विभाग अस्तित्वात आले. विद्यार्थी विकास विभाग हा त्यातील विविध पैलू असलेला एक महत्त्वाचा विभाग आहे. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून अनेक महत्त्वाचे उपक्रम या विभागाच्यावतीने राबविले जातात. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधला जावा म्हणून, अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम या विभागाने आयोजित केले आहेत.

विभागातील उपलब्ध तपशीलानुसार १६ मे १९९५ रोजी डॉ. ना. आ. मोटे हे विद्यार्थी विकास विभागाचे पहिले संचालक म्हणून रुजू झाले. नंतरच्या काळात पूर्णवेळ आणि प्रभारी मिळून आजपर्यंत १९ संचालकांनी या विभागाचे काम पाहिले आहे. विभागाच्या उभारणीमध्ये डॉ. ना. आ. मोटे यांच्यापासून ते आजपर्यंतच्या सर्व संचालकांचा मोलाचा वाटा राहिलेला आहे. अगदी कमी कालावधीतच या विभागाने विद्यापीठाच्या इतिहासात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करून विद्यापीठास सांकृतिक क्षेत्रात नावलौकिक मिळवून दिला आहे.

चार दिवसीय आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव, विद्यापीठ परिसर विद्यार्थी परिषद आणि विद्यापीठ विद्यार्थी परिषद घटित करण्यासाठी निवडणुकांचे आयोजन, बहिःशाल शिक्षण केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण भागात जनजागृतीसाठी व्याख्याने, महामानवांच्या नावे आठ विशेष व्याख्यानमाला, आर्थिकदृष्ट्या

कमकुवत व होतकरू विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी कल्याण आणि पुरस्कार योजना, विद्यापीठ परिसराचे वार्षिक स्नेहसंमेलन, उत्कृष्ट वार्षिक अंक निवड व पारितोषिक वितरण, पारितोषिक विजेत्या विद्यार्थी कलावंतांचा गुणगौरव सोहळा, राष्ट्रीय सण व महामानवांच्या जयंत्या, ज्येष्ठ नागरिक सहायता कक्ष, इंद्रधनुष्य, पश्चिम विभागीय युवक महोत्सव, राष्ट्रीय युवक महोत्सवासाठी विद्यापीठाचा संघ पाठविणे आदी महत्त्वाचे उपक्रम प्रस्तुत विभागामार्फत घेतले जातात.

विभागाने अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम आयोजित केले आहेत. महामानवांच्या जयंतीनिमित्त विविध मान्यवर अभ्यासकांची व्याख्याने, कार्यशाळा, विविध प्रकारच्या स्पर्धा, कमवा आणि शिका योजनेची अंमलबजावणी, राजस्तरीय इंद्रधनुष्य आंतर विद्यापीठ युवक महोत्सवाचे आयोजन, विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेण्यासाठी विद्यापीठ संघाचे प्रशिक्षण शिबीर, प्रस्तुत विद्यापीठात आयोजित राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत आणि क्रीडा महोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन इ. यामध्ये समावेश होतो.

५ ते ९ नोव्हेंबर २०१२ दरम्यान प्रस्तुत विद्यापीठात राज्यस्तरीय 'इंद्रधनुष्य युवक महोत्सव' आयोजित करण्यात आला होता. विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या युवक महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे तत्कालीन कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे आणि विद्यार्थी विकास संचालक डॉ. गणेश शिंदे यांच्या प्रयत्नातून राज्यपाल महोद्‌यांच्या मान्यतेने लावणी हा कलाप्रकार इंद्रधनुष्य स्पर्धेत समाविष्ट करण्यात आला. त्यामुळे प्रस्तुत विद्यापीठात संपन्न झालेल्या इंद्रधनुष्य युवक महोत्सवात प्रथमच लावणी सादर झाली. नंतर काही कारणाने ती 'इंद्रधनुष्य'मधून वगळण्यात आली.

सन २०१५-१६ मध्ये प्रामुख्याने मराठवाड्यात मोठा दुष्काळ पडल्यामुळे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मार्गात अनेक आर्थिक अडचणी निर्माण झाल्या. दुष्काळाची झळ बसलेले आणि आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेले अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहण्याची परिस्थिती निर्माण झाली. या परिस्थितीचा विचार करून मा. कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांनी 'विद्यार्थी कल्याण आणि पुरस्कार योजना' सुरू केली. ज्यांना शासनाकडून, विद्यापीठाकडून किंवा अन्य संस्थेकडून कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत मिळत नाही अशा अभ्यासू, गरजू, होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करणे, हा या योजनेचा हेतू आहे. सन २०१५-१६ मध्ये मा. कुलगुरू महोदयांनी अनेक व्यक्ती, संस्था यांना आर्थिक मदतीचे आवाहन केल्यानंतर डॉ. अब्राहम यांच्या प्रयत्नातून दक्षिण



भारतीय शिक्षण संस्थेने दहा लाख रुपयांची मदत करून या योजनेला मोठा हातभार लावला. विद्यापीठातील अधिकारी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनीही आर्थिक मदत देऊ केली. विशेष बाब म्हणजे मा. कुलगुरू महोदय अनेक कार्यक्रमांना मार्गदर्शक म्हणून गेल्यानंतर संबंधितांकडून प्राप्त होणारा प्रवास भत्ता व मानधन 'विद्यार्थी कल्याण आणि पुरस्कार योजनेसाठी' देऊ केल्याने अनेक विद्यार्थ्यांना याचा फायदा झाला. मा. कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०१५-१६ ते २०१७-१८ दरम्यान प्रस्तुत योजना अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने विद्यार्थी विकास विभागाच्यावतीने राबविण्यात आली. त्यात प्रस्तुत विभागाच्या माध्यमातून सुमारे पाचशे विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला.

कुलगुरू मा. डॉ. पंडित विद्यासागर यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थी विकास विभागातर्फे दि.१० डिसेंबर २०१५ हा दिवस 'मानवी हक्क दिन' म्हणून साजरा करण्यात आला. मानवी हक्क दिनाच्या निमित्ताने प्रस्तुत विद्यापीठातील सामाजिक शास्त्रे संकुलामध्ये प्रा. विठ्ठल दहिफळे, पीपल्स कॉलेज, नांदेड यांचे 'मानव अधिकार : सिद्धांत आणि व्यवहार' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. मानवी हक्क-अधिकारांच्या संदर्भात विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण व्हावी, हा या व्याख्यानामागील हेतू होता.

विद्यार्थी विकास विभागातर्फे दि.२५ डिसेंबर २०१५ रोजी श्री. अटल बिहारी वाजपेयी यांचा जन्मदिवस 'सुशासन दिन' म्हणून साजरा करण्यात आला. सुशासन दिनाच्या निमित्ताने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील सिनेट सभागृहामध्ये डॉ. बालाजी कत्तुरवार, देगलूर महाविद्यालय, देगलूर यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. 'तणाव मुक्ती व्यवस्थापन' या विषयावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

दि. २७ नोव्हेंबर ते ०१ डिसेंबर, २०१५ दरम्यान प्रस्तुत विद्यापीठात राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. सदरील कार्यक्रमात विद्यार्थी विकास विभागातर्फे दि. २८, २९ व ३० नोव्हेंबर, २०१५ रोजी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात होते. सांस्कृतिक कार्यक्रमाविषयी विविध विद्यापीठाकडून आलेल्या संघातील संघ प्रमुख व विद्यार्थ्यांकडून लेखी अभिप्राय (फीडबॅक) घेण्यात आला. तो अतिशय उत्तम होता.

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ चा 'आविष्कार-२०१६' राज्यस्तरीय आंतर

विद्यापीठ विज्ञान संशोधन महोत्सव दि. २७ ते २९ जानेवारी, २०१७ दरम्यान प्रस्तुत विद्यापीठात आयोजित करण्यात आला होता. सदरील कार्यक्रमात राष्ट्रगीत व विद्यापीठगीत सादर करण्यात आले. तसेच दि. २८ जानेवारी, २०१७ रोजी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात विविध कलाप्रकाराचे उत्तम सदरीकरण विद्यार्थी कलावंतांनी करून कार्यक्रम यशस्वी केला.

महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ११ एप्रिल २०१७ रोजी विद्यार्थी विकास विभाग व डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. जयदेव डोळे यांचे व्याख्यान घेण्यात आले. दि. ५ ऑक्टोबर २०१७ रोजी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जयंतीच्या निमित्ताने डॉ. वि.ल. धारूरकर यांचे व्याख्यान संपन्न झाले. दि. १९ एप्रिल २०१८ रोजी विद्यापीठ विद्यार्थी परिषद उद्घाटन सोहळ्यानिमित्त डॉ. अंजली धानोरकर यांनी 'सॉफ्ट स्कील' या विषयावर मार्गदर्शन केले. दि. १२ ते १४ मार्च २०१८ दरम्यान विद्यापीठ परिसर वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. प्रसिद्ध कवी योगिराज माने यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्यांच्या काव्यवाचनाने विद्यार्थी प्रभावित झाले. समारोप प्रसंगी प्रसिद्ध कवी पी. विठ्ठल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विभागाने आजपर्यंत विद्यापीठास राज्यस्तरीय इंद्रधनुष्य, पश्चिम विभागीय आणि राष्ट्रीय आंतरविद्यापीठ युवक महोत्सवात मोठ्याप्रमाणात पारितोषिकं प्राप्त करून दिली आहेत. विभागाच्या निर्मितीपासूनच विद्यार्थ्यांनी युवक महोत्सवात अनेक पारितोषिके प्राप्त केली आहेत. सन २००९ ते २०१४ पर्यंत ८९ पारितोषिके प्राप्त झाली आहेत. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ ते २०१७-१८ या तीन वर्षात विद्यापीठास राज्यस्तरीय, विभागीय, राष्ट्रीय स्तरावर संपन्न झालेल्या युवक महोत्सवात एकूण ४१ पारितोषिके प्राप्त झाली आहेत. राज्यस्तरीय, विभागीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यापीठास सांस्कृतिक क्षेत्रात नावलौकिक मिळवून देण्याचे कार्य प्रस्तुत विभागाने केले आहे. विशेष बाब म्हणजे किरण देशमुख या विद्यार्थ्याने दि. १५ ते १९ फेब्रुवारी, २०१६ दरम्यान म्हैसूर विद्यापीठात आयोजित राष्ट्रीय युवक महोत्सवात वक्तृत्व स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले. 'भारत की सांस्कृतिक विरासत' या विषयावर सुंदर मांडणी करून द्वितीय पारितोषिक प्राप्त केल्यामुळे तो दक्षिण आशियायी आंतरराष्ट्रीय युवक महोत्सवासाठी पात्र ठरला. त्यामुळे किरण देशमुख या विद्यार्थ्याने दि. २८



फेब्रुवारी ते ०४ मार्च २०१७ दरम्यान इंदौर येथील अहिल्यादेवी विद्यापीठात संपन्न झालेल्या दक्षिण आशियाई आंतरराष्ट्रीय युवक महोत्सवात वक्तृत्व स्पर्धेत भारताचे नेतृत्व केले. ही विद्यापीठाच्या दृष्टीने अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. या विभागाच्या यशामध्ये मार्गदर्शक, संघव्यवस्थापक, प्रशिक्षक, वादक व विद्यार्थी कलावंत म्हणून अनेकांचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे. डॉ. रामप्रसाद तौर, डॉ. अंबादास कांबळे, डॉ. मा. मा. जाधव, डॉ. शंकर विभूते, डॉ. देशमुख, डॉ. एम. आर. जाधव, डॉ. सुनिल व्यवहारे, डॉ. विजया साखरे, डॉ. शिवदत्त विभूते, डॉ. संदीप काळे, डॉ. बालाजी भंडारे, डॉ. पांडुरंग पांचाळ, प्रा. महेश भोसले, नवलाजी जाधव, सिद्धार्थ नागठाणकर, संतोष साळुंके, बालाजी सूळ, कैलास पपुलवाड, दिलीप डोंबे, शिवराज शिंदे, वैभव माने, विभागातील कर्मचारी आदींचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे.

दरवर्षी आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवाचे आयोजन करणे, ही या विभागाची एक महत्त्वाची जबाबदारी आहे. सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात किंवा ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात विद्यापीठ व विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या युवक महोत्सवाचे आयोजन केले जाते. नांदेड, लातूर, परभणी आणि हिंगोली अशा चार जिल्ह्यातील सुमारे शंभर महाविद्यालयांचा यात सहभाग असतो. चार दिवस चालणाऱ्या या युवक महोत्सवात सुमारे दीड हजार मुले-मुली आपली कला पाच वेगवेगळ्या मंचावरून सादर करतात. मा. कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर आणि प्र-कुलगुरू डॉ. गणेशचंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली युवक महोत्सवात अनेक महत्त्वाचे बदल करून त्यात नेमकेपणा व गुणवत्ता आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ च्या युवक महोत्सवापासून अनेक महत्त्वाचे बदल करण्यात आले. आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवात नेमकेपणा आणण्यासाठी इंद्रधनुष्य आणि पश्चिम विभागीय युवक महोत्सवात समाविष्ट नसणारे काही कलाप्रकार वगळून इन्स्टॉलेशन (टाकाऊ पासून टिकाऊ) हा कलाप्रकार नव्याने समविष्ट करण्यात आला. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ युवक महोत्सवात प्रस्तुत विद्यापीठास इन्स्टॉलेशन (टाकाऊ पासून टिकाऊ) या कलाप्रकारात तृतीय पारितोषिक प्राप्त झाले व या पारितोषिकामुळे सदरील विद्यापीठ संघ याच शैक्षणिक वर्षाच्या अखिल भारतीय राष्ट्रीय युवक महोत्सवासाठी पात्र झाला. या राष्ट्रीय युवक महोत्सवात इन्स्टॉलेशन कलाप्रकारात राष्ट्रीय स्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ चा आंतर

महाविद्यालयीन युवक महोत्सव दि. २७ ते ३० सप्टेंबर २०१६ दरम्यान मातोश्री प्रतिष्ठान, खुपसरवाडी, नांदेड येथे घेण्यात आला. या युवक महोत्सवात प्रथमच महाविद्यालयांना सादरीकरणासाठी लॉट्स क्रमांक देऊन त्याचे पालन बंधनकारक करण्यात आले. आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवात अशा प्रकारचा प्रयोग करणारे कदाचित हे महाराष्ट्रातील पहिलेच विद्यापीठ असेल. त्यामुळे युवक महोत्सवाच्या वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन होऊन सादरीकरणात नेटकेपणा आला. याबरोबरच युवक महोत्सवाच्या माध्यमातून तरुणाईचे प्रबोधन व्हावे म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सपकाळ यांना निमंत्रित करण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०१५-१६चा आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव सहयोग सेवाभावी संस्थेचे, इंदिरा कॉलेज ऑफ फॉर्मसी, विष्णुपुरी नांदेड येथे दि.१४ ते १७ ऑक्टोबर २०१५ दरम्यान संपन्न झाला. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ चा आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव दि. २३ ते २६ सप्टेंबर, २०१७ दरम्यान ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालय विष्णुपुरी येथे मोठ्या थाटात संपन्न झाला. यातही लॉट्स पद्धतीचा वापर करण्यात आला. युवक महोत्सवाला 'वसुंधरा' असे नाव देऊन मानवी जीवन आणि पर्यावरणाच्या संदर्भात जनजागृती घडवून आणण्यासाठी श्री. पोपटराव पवार यांना मार्गदर्शनासाठी निमंत्रित करण्यात आले होते. तसेच विद्यार्थ्यांचे सामाजिक जाणिवेच्या अंगाने प्रबोधन व्हावे म्हणून महाराष्ट्रातील प्रसिद्ध समखंजीरवादक श्री. सत्यपाल महाराज यांचा 'सत्यवाणी' हा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला. त्याला विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला. अर्थातच कलेतून विचार आणि संस्कार देता येतो, हे या दोन युवक महोत्सवांनी सिद्ध केले.

सामाजिक बांधिलकी जोपासण्याच्या भावनेतून विद्यापीठाच्या वतीने विद्यार्थी विकास विभागांतर्गत बहि:शाल शिक्षण केंद्र चालवली जातात. सेवाभावी संस्था, सार्वजनिक वाचनालये, बचत गट आणि महाविद्यालयाच्या माध्यमातून विविध विषयावर औपचारिक शिक्षणापासून वंचित राहिलेल्या समाज घटकांचे प्रबोधन घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो. समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुभाव आणि न्याय ही मूल्ये रुजविणे, हे या शिक्षण केंद्रांचे उद्दिष्ट आहे. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून या बहि:शाल शिक्षण केंद्राच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल करण्यात आला आहे. बहि:शाल वक्त्यांची जुनी यादी रद्द करून नव्याने बहि:शाल वक्त्यांच्या परिचयात्मक मुलाखती घेऊन नवी यादी तयार करण्यात आली. तसेच समाजाच्या विविध क्षेत्रात महत्त्वाचे योगदान असणाऱ्या निवडक व्यक्तींचाही निमंत्रित वक्ते म्हणून यादीत समावेश करण्यात आला आहे. त्या-त्या शैक्षणिक वर्षात कृती आराखडा कार्यशाळेचे आयोजन करून केंद्र संयोजक, समन्वयक आणि वक्ते यांना तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले. यासाठी विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर आणि प्र- कुलगुरू डॉ. गणेशचंद्र शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि पुणे येथील निवृत्त संचालक डॉ. तेज निवळीकर, डॉ. कैलास बवले यांचे महत्त्वाचे सहकार्य लाभले.

प्रस्तुत विद्यापीठात ज्येष्ठ नागरिक सहायता कक्ष सुरू करण्यात यावा, अशी अनेक वर्षांपासूनची मागणी होती. या मागणीचा विचार करून मा. कुलगुरू महोदयांनी विद्यार्थी विकास विभागांतर्गत 'ज्येष्ठ नागरिक साह्यता कक्ष' सुरू करण्यास मान्यता दिली. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रस्तुत कक्ष सुरू करण्यात आला. यानिमित्ताने 'ज्येष्ठ नागरिक साह्यता कक्षा'चा उद्‌घाटन सोहळा दि.१२ जून, २०१७ रोजी आयोजित करून ज्येष्ठ नागरिकांना निमंत्रित करण्यात आले. सदरील कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. तेज निवळीकर हे उपस्थित होते. मा. कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांच्या अध्यक्षतेखाली व प्र-कुलगुरू डॉ. गणेशचंद्र शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उद्‌घाटन सोहळा संपन्न झाला.

शासकीय निर्देशानुसार राष्ट्रीय सण आणि महामानवांच्या जयंत्या साजरे करण्याची जबाबदरी प्रस्तुत विभागाकडे आहे. केवळ महामानवांची जयंती साजरी न करता त्यांचे जीवनकार्य तरुण पिढीला समजावे, त्यातून त्यांना प्रेरणा मिळावी म्हणून अशा दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी अनेक महत्त्वपूर्ण विषयावर व्याख्यानांचे आयोजन केले आहे. विद्यार्थी विकास विभाग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५व्या जयंतीनिमित्त दि. ११ ते १३ एप्रिल, २०१६ दरम्यान फुले-शाहू-आंबेडकर या विशेष व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्र-कुलगुरू डॉ. गणेशचंद्र शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत तीन दिवस चाललेल्या या व्याख्यानमालेत डॉ. वासुदेव मुलाटे, डॉ. प्रल्हाद लुलेकर आणि डॉ. अशोक राणा यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. ०७ फेब्रुवारी, २०१८ रोजी राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून मा. राजश्री पाटील व प्रा. महेश जोशी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला.

दि. २० फेब्रुवारी, २०१८ रोजी विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने

मा. एस. एन. सुब्बाराव यांचे विशेष व्याख्यान आणि 'भारत की संतान' या विविध भाषा व वेशभूषेतील नृत्यगीताचे सादरीकरण या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा येथील संघाने 'भारत की संतान' या नृत्यगीताचे सादरीकरण केले. हा नावीन्यपूर्ण उपक्रम मा. कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. मा. एस. एन. सुब्बाराव यांनी आपल्या व्याख्यानातून राष्ट्रीय एकात्मता, तरुणांची भूमिका, शिक्षणाचा खरा हेतू आदी बाबीसंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांमध्ये एकतेची भावना निर्माण करण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम महत्वाचा ठरला.

दरवर्षी विद्यापीठ परिक्षेत्रातील प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत विविध महाविद्यालयांकडून त्यांनी प्रकाशित केलेला वार्षिक अंक परिपत्रकाद्वारे मागविण्यात येतो. विद्यार्थ्यांना व महाविद्यालयांना प्रोत्साहन म्हणून त्यातील उत्कृष्ट वार्षिक अंकांची निवड करून प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांक काढून १७ सप्टेंबर या विद्यापीठ वर्धापनदिनी त्यांचा पारितोषिक देऊन गौरव केला जातो. तसेच राज्यस्तरीय, पश्चिम विभागीय व राष्ट्रीय युवक महोत्सवामध्ये पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा गौरवही विद्यापीठ वर्धापनदिनी केला जातो.

शिक्षा मंडळ, वर्धा येथे 'हमारा राष्ट्र कैसा है और वह हो सकता है कैसा?' या विषयावर दि. २२ व २३ जानेवारी २०१७ दरम्यान ४३ व्या कमलनयन बजाज मेमोरियल राष्ट्रीय आंतरविद्यापीठ वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदरील स्पर्धा १९७५ पासून शिक्षा मंडळ, वर्धाकडून आयोजित केली जाते. उपरोक्त स्पर्धेसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून किरण प्रकाशराव देशमुख यास पाठविण्यात आले होते. या स्पर्धेत किरण देशमुख या विद्यार्थ्याने दिलेल्या विषयावर मुद्देसूद मांडणी करून उत्कृष्ट सादरीकरण केले. अत्यंत मानाच्या समजल्या जाणाऱ्या या स्पर्धेत भारतातील विविध विद्यापीठातून सहभाग नोंदविलेल्या स्पर्धक विद्यार्थ्यांमधून किरण प्रकाशराव देशमुख याने सर्वप्रथम पारितोषिक प्राप्त केले. ही विद्यापीठासाठी गौरवाची बाब आहे.

वर्ष २०१६ पासून शासन निर्णयानुसार प्रस्तुत विद्यापीठात जागतिक योग दिन साजरा करण्यात येतो. शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी योगासाने अत्यंत महत्त्वाची आहेत. त्यादृष्टीने विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांसाठी २०१६ पासून दरवर्षी २१ जून यादिवशी विद्यार्थी विकास विभाग व क्रीडा विभागाच्या वतीने योगदिनाचे आयोजन केले जाते. तज्ज्ञ व्यक्तींच्या



मार्गदर्शनाखाली उपस्थितांकडून योगासने करून घेतली जातात. त्यानुसार २१ जून २०१८ रोजी तिसरा आंतरराष्ट्रीय योग दिन विद्यापीठातील क्रीडा विभागाच्या इनडोर हॉल मध्ये आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. रामचंद्र गरड व श्री. शिवमूर्ती भातांब्रे यांची उपस्थिती होती. त्यांनी उपस्थितांकडून विविध योगासने करून घेतली. सदरील कार्यक्रम मा. कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांच्या अध्यक्षतेखाली व प्र-कुलगुरू डॉ. गणेशचंद्र शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या प्रसंगी मा. कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांनी प्राचीन काळातील योगाचे महत्त्व अधोरेखित करून त्याची प्रासंगिकता उपस्थितांना समजावून सांगितली.

प्रस्तुत विभागाकडे विद्यार्थ्यांच्या निवडणुकांची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण निर्माण व्हावा, लोकशाहीचे संवर्धन व्हावे म्हणून विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार दरवर्षी विद्यार्थी परिषद घटित करण्यासाठी निवडणुका घेतल्या जातात. विद्यापीठ परिसरासाठी एक विद्यापीठ विद्यार्थी परिषद घटित केली जाते. तसेच संपूर्ण विद्यापीठ परिक्षेत्रासाठी एक विद्यापीठ विद्यार्थी परिषद घटित करण्यात येते.

अशाप्रकारे विद्यार्थी विकास विभागाने शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमावर आपले लक्ष केंद्रित करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी प्रयत्न केले आहेत. विद्यार्थी विकास विभाग हा केवळ सांस्कृतिक कार्यक्रमापुरता मर्यादित न राहता खऱ्या अर्थाने विद्यार्थी केन्द्री विभाग बनला आहे.

•••